सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २५१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ६ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानाला सुरुवात

## दुपारी ३ वाजेपर्यंत ५३.७७% मतदान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६पाटणा**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानाला आज सुरुवात झाली आहे. दुपारी १ वाजेपर्यंत ४२.३ टक्के मतदान झाले आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीत मतदान सुरु असताना दोन वेगवेगळ्या घटनांत बिहारचे उपमुख्यमंत्र्यांच्या ताफ्यावर तसेच सीपीएमच्या उमेदवारावर हल्ला झाल्याची घटना घडली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते विजय सिन्हा यांच्या




ताफ्यावर लखीसराय येथे हल्ला करण्यात आला आहे. सिन्हा यांनी थेट राष्ट्रीय जनता दलाच्या कार्यकर्त्यांना जबाबदार धरले आहे. त्यांनी या घटनेचा उल्लेख आरजेडीच्या गुंडांचे कारस्थान असा करत त्यांच्यावर सडकून टीका केली. लोकशाहीमध्ये अशा प्रकारची अराजकता आणि गुंडगिरी अजिबात स्वीकारली जाणार नाही, असे सिन्हा यांनी सांगितले. निवडणूक आयोगाकडे आणि प्रशासनाकडे या हल्ल्याची गंभीर दखल घेऊन, हल्लेखोरांवर सखत कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दुसऱ्या घटनेत छपरा येथे सीपीएम उमेदवार मांझीचे आमदार सत्येंद्र यादव यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आला आहे. यादव यांना मारहाणही करण्यात आल्याचे समोर येत आहे. सारण जिल्ह्यातील मांझी विधानसभा मतदारसंघातील जैतपूर गावातील बूथ क्रमांक ४१, ४२, ४३ आणि ४४ वर काही लोकांनी यादव यांच्यावर हल्ला केला. तसेच गाडीची तोडफोडही करण्यात आली आहे. माहिती मिळताच डीएसपी आणि इतर पोलिस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. पोलिस या प्रकरणाची चौकशी करत आहेत. दौडपूर पोलिस ठाण्यात एफआयआर नोंदविण्यात आली.

# मुख्यमंत्री असताना कारपेट सोडलं नाही, आता कितीही प्रयत्न केले तरी प्रतिसाद मिळणार नाही ...; फडणवीसांचा ठाकरेंवर पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या राज्यव्यापी दौऱ्यांवर आणि शेतकऱ्यांच्या भेटीगाठींवरून थेट टीकास्त्र सोडले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी 'कारपेट' सोडले नाही. सततच्या पराभवानंतर त्यांना लोकांमध्ये जावे लागत असल्याची जाणीव झाली. म्हणूनच ते घराबाहेर पडले आहेत,असा टोला फडणवीसांनी लगावला.



देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरे बाहेर पडले याचा मला आनंद आहे. कारण ते मुख्यमंत्री असताना जेव्हा शेतकऱ्यांनावर संकट आले होते, त्यावेळेस ते कारपेटवरून खाली उतरले नव्हते. आता किमान सततच्या पराभवानंतर त्यांच्या लक्षात आले आहे की, लोकांमध्ये जावा लागते. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे पाठ फिरवली आहे. कारण त्यांना माहिती आहे की, हे लोक केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून याठिकाणी आलेले आहेत. त्यांना जनतेकडून फारसा प्रतिसाद मिळत नाहीये. म्हणून लोक पकडून आणण्याचे काम त्याठिकाणी सुरू आहे,' अशीही त्यांनी टीका केली.

शेतकऱ्यांच्या मदत पॅकेजबाबत बोलताना फडणवीस यांनी सरकारी उपाययोजनांचा बचाव केला, तसेच विलंबाचे कारणही स्पष्ट केले. सरकारचे पॅकेज शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचत आहे. हे खरं आहे की, अजूनही काही शेतकऱ्यांच्या खात्यात पॅकेज पोहोचले नाही, त्यामुळे त्यांच्यात संभ्रम आहे. पण, आरबीआयच्या नियमानुसार दररोज ६०० कोटी रुपये आम्हाला द्यावे लागतात. त्यामुळे थोडा वेळ लागतोय. लवकरच सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा होईल, असे आश्वासन त्यांनी दिले. शिवाय, उद्धव ठाकरे यांनी निवडणुकीच्या तोंडावर कितीही प्रयत्न केला तरी त्यांना फारसा प्रतिसाद मिळणार नाही, असे भाकीत त्यांनी वर्तवले.

# पार्थ पवारांवर जमीन घोटाळ्याचा आरोप मुख्यमंत्री फडणवीसांचे चौकशीचे आदेश

## तहसीलदार सूर्यकांत येवले याचे तड़काफडकी निलंबन


**विदर्भ प्रजासत्ताक दि.६पुणे**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या 'अमीडिया होल्डिंग्स एलएलपी' या कंपनीच्या जमीन खरेदीच्या व्यवहाराने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नेते अंबादास दानवे यांनी या व्यवहारात गंभीर अनियमितता असल्याचा आणि १८०४ कोटी बाजारभाव असलेली जमीन केवळ ३०० कोटींना विकत घेतल्याचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे, या ४० एकर जमिनीच्या व्यवहारासाठी स्टॅम्प ड्युटी म्हणून केवळ ५०० भरण्यात आल्याचा आणि हा व्यवहार केवळ २७ दिवसांत पूर्ण झाल्याचा आरोपही दानवे यांनी केला आहे. महार वतनाची जमीन आणि सरकारी नियमांना बगल देऊन हा व्यवहार झाल्याचा विरोधकांचा दावा आहे. या आरोपामुळे राजकीय वातावरण तापले असतानाच, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पार्थ पवार यांच्या कंपनीवर झालेल्या या गंभीर आरोपांची गांभीर्याने दखल घेतली आहे. पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी या प्रकरणावर पहिली प्रतिक्रिया दिली आणि या जमीन खरेदी व्यवहाराची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणात आता प्रशासन ॲक्शनमोडवर आले असून तहसीलदार सूर्यकांत येवले याचे निलंबन करण्यात आले आहे.

या प्रकरणाच्या संदर्भात सगळी माहिती



मी मागवली आहे. महसूल विभाग, आयजीआर, लँड रेकॉर्ड असतील या संदर्भातील सगळी माहिती मागवली आहे. याप्रकरणी योग्य ते चौकशीचे आदेश दिलेले आहेत. ही सगळी माहिती आणि प्राथमिक चौकशीच्या आधारावर आहे. जे सांगायचे ते सांगणार आहे. माझ्याकडे अद्याप पूर्ण माहिती आलेली नाही. जे मुद्दे समोर आलेत ते गंभीर आहेत त्यामुळे त्याची योग्य प्रकारे माहिती घेऊनच बोललं पाहिजे. त्या दृष्टीने ही माहिती आज माझ्याकडे येणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार अशा प्रकाराला पाठीशी घालतील असं माझं मत नाही. कारण या संदर्भात आमच्या सरकारचे एक मत आहे. कुठेही अनियमितता झाली असेल तर त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे या मताचे आम्ही आहोत. त्यामुळे अनियमितता आहे की नाही हे पडताळून पाहिले जाईल. असेल तर त्याच्यावर अतिशय कडक कारवाई केली जाईल, असा इशारा मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.

# 'मतचोरी'च्या कायदेशीर लढाईत सहभाग का नाही? : आंबेडकरांचा राहुल गांधींना सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

हरियाणा निवडणुकीतील मतदार यादीतील कथित हेराफेरीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या 'प्रझेंटेशन'चे कौतुक करतानाच, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी त्यांना थेट आणि कठोर शब्दांत जाब विचारला आहे. निवडणुकीच्या निकालांना आव्हान देण्यासाठी 'निवडणूक याचिका' हाच एकमेव कायदेशीर मार्ग आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील '७६ लाख मतांच्या' वाढीच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या लढ्यात काँग्रेसने सहभाग का घेतला नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

राहुल गांधींनी सादर केलेले 'प्रझेंटेशन' केवळ सादरीकरण आहे, त्यामुळे निवडणूक आयोग कायदेशीररित्या जबाबदार ठरत नाही, असे आंबेडकरांनी स्पष्ट केले. तसेच



जेव्हा गरज होती, तेव्हा तुम्ही का लढला नाहीत? असा रोखठोक सवाल राहुल गांधी यांना केला.

प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्रातील २०२४ च्या विधानसभा निवडणुकीचा दाखला दिला. मतदानाची अधिकृत वेळ संपल्यानंतर अचानक ७६ लाख मतांची वाढ झाली होती, या गंभीर गैरप्रकाराला वंचित बहुजन आघाडीचे चेतन अहिरे यांनी आव्हान दिले होते. त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली, तसेच हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंतही नेले, असे आंबेडकरांनी सांगितले. मी तुम्हाला आणि काँग्रेस अध्यक्ष खर्गे यांना अनेकवेळा पत्र लिहून, आमच्या याचिकेत सह-याचिकाकर्ते म्हणून सामील होण्याची विनंती केली होती. मात्र, मला कधीही उत्तर मिळाले नाही. तुम्ही (राहुल गांधी) तेव्हा का लढला नाहीत? असा थेट आणि धारदार सवाल आंबेडकरांनी राहुल गांधींना केला आहे.

# मनोज जरांगेंच्या हत्येच्या कट, परळीच्या बड्या नेत्याचं कनेक्शन; पोलिसांनी दोघांना घेतलं ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६बीड**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या जीवाला धोका आहे. मनोज जरांगेंना जीवे मारण्याचा कट रचला जात आहे. याप्रकरणी दोन संशयितांना जालना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. यासंदर्भात मध्यरात्री मनोज जरांगे यांच्या उपस्थितीत जालना पोलिस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.



मनोज जरांगे यांच्या सहकाऱ्यांनी जालना पोलिस अधीक्षकांना निवेदन दिले. याप्रकरणी जालना पोलिसांनी २ संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. मनोज जरांगेंच्या हत्येची ऑफर देणारा बडा नेता बीडच्या परळीतील असल्याची माहिती उघड झाली आहे. पोलिस सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत.

मनोज जरांगे यांच्या हत्येचा कट रचण्यात बीडच्या परळीमधील एका बड्या नेत्याचा हात असल्याचे बोलले जात आहे. पोलिसांनी ज्या दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं त्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या एका सहकाऱ्यासह अन्य एका व्यक्तीचा समावेश आहे. बीडमध्ये मनोज जरांगेच्या हत्येचा कट रचण्यासाठी बैठका पार पडल्या. याप्रकरणी जालना स्थानिक गुन्हे शाखेने बीडमधून दोघांना ताब्यात घेतले. अमोल खुणे आणि दादा गरुड असं ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची नावे आहेत. अमोल खुणे हा मनोज जरांगे पाटील यांचा जुना सहकारी असल्याचे सांगितले जात आहे.

# राज ठाकरेंसोबत 'आघाडी' ला नकार मनसे सोबत न जाण्यावर काँग्रेस ठाम?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून प्रत्येक पक्षा या निवडणुकीसाठी जोरदार तयारी करताना दिसत आहे. काही पक्ष युती करण्याची तयारी करत आहे तर काही पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याची तयारी केली आहे. यातच राज्यातील राजकारणातून एक मोठी बातमी समोर आली आहे. या बातमीनुसार, काँग्रेस आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मनसेसोबत जाणार नाही. महाराष्ट्र काँग्रेस याबाबत लवकरच दिल्ली हायकमांडला माहिती देणार आहे. टिळक भवन येथे काँग्रेस नेत्यांच्या बैठकीत मनसेसोबत न जाण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे मात्र याबाबत आतापर्यंत कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात



आलेली नाही.

तर दुसरीकडे मुंबई महापालिका स्वबळावर जर लढलो तर जास्त जागा काँग्रेस लढू शकतो अशी देखील चर्चा या बैठकीत झाली असल्याची माहिती समोर येत आहे. तर महाविकास आघाडीतील ठाकरे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्ष सोबत आघाडी होऊ शकते अशी शक्यता आता राजकीय वर्तुळात सुरु आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आयोजित टिळक भवन येथील बैठकीत काँग्रेसने मनसेसोबत न जाण्याचा निर्णय घेतला असून या निर्णयाबाबत दिल्ली हायकमांडला माहिती देणार असं देखील सांगण्यात येत आहे.

# अजित पवारांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा; हर्षवर्धन सपकाळांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवारच्या कंपनीने पुण्यातील वतनाची ४० एकर जमीन भ्रष्ट मार्गाने बळकावल्याचे उघड झाले आहे. पार्थ पवार यांनी हजारो कोटी रुपयांची जमीन केवळ ३०० कोटी रुपयात म्हणजे कवडीमोल भावाने हडप केली असून स्टँप ड्युटी फक्त ५०० रुपये दिली आहे. सरकारच्या ताब्यात असणाऱ्या वतनाच्या या जमिनीचा व्यवहार झालाच कसा? असा प्रश्न विचारून भ्रष्ट उपमुख्यमंत्री अजित



पवार यांची हकालपट्टी करण्याचे धाडस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवावे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पुढे म्हटले आहे की, अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार याची अमेडिया नावाची कंपनी असून या कंपनीने कोरेगाव पार्क भागातील जमीन अत्यंत अल्प किंमतीत घेतली आहे, ज्या कंपनीने हा व्यवहार केला त्या अमेडिया कंपनीचे भागभांडवल फक्त १ लाख रुपये आहे. अमेडिया कंपनीला या जागेत आयटी पार्क उभारायचे आहे आणि त्यास सरकारच्या उद्योग संचालनालयाने अवघ्या ४८ तासात मंजुरीही दिली. सरकारच्या ताब्यात असलेली वतनाची जमीन विकत घेता येते का ? स्टॅम्प ड्युटी माफ का केली? असे प्रश्न हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित करून हा व्यवहार रद्द करावा व संपूर्ण व्यवहाराशी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून सर्वांची उच्चस्तरीय चौकशी करा, अशी मागणी सपकाळ यांनी केली आहे.

# खळबळजनक! संपादकासह चार खंडणीबाज पत्रकारांना अटक

## विधवा महिलेकडून एक लाखाची खंडणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६चंद्रपूर**

दिवाळी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका बघता जिल्ह्यात पत्रकारांचा सुळसुळाट झाला आहे. अशाच खंडणीबाज पत्रकारांनी चंद्रपूर शहरातील एका असहाय व विधवा महिलेला धाक दाखवून तिच्याकडून एक लाखाची खंडणी स्वीकारल्या प्रकरणी सत्यशोधक न्युज, चंद्रपूर (वेबपोर्टल) मुख्य संपादक राजु नामदेवराव शंभरकर (५७), इंडिया २४ न्यूज, चंद्रपूर (वेबपोर्टल) चे चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी कुणाल यशवंत गर्गेलवार (३७), दैनिक विदर्भ कल्याणचे चंद्रपूर तालुका प्रतिनिधी अविनाश मनोहर मडावी (३३) तथा भारत टी.व्ही. न्यूज, आग्रा (टी.व्ही. चॅनल) चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी राजेश नारायण निकम (५६) या चौघांना अटक केल्याने पत्रकारांच्या वर्तुळात खळबळ उडाली आहे.

जिल्ह्यात खंडणीबाज पत्रकारांचा सुळसुळाट आहे. अशा बोगस व खंडणीबाज पत्रकारांविरूध्द पोलीस दलाने मोहिम सुरू केली आहे. याच मोहिमेत खंडणीबाज पत्रकार राजु शंभरकर, कुणाल यशवंत गर्गेलवार, अविनाश मडावी तथा राजेश निकम यांनी पत्रकार असल्याचा धाक दाखवून एका विधवा महिलेच्या घरी गेले व ती अवैध काम करत आहे त्याबाबत बातमी प्रसिध्द न करण्यासाठी सदर महिलेकडून एक लाख रुपयाची मागणी केली. पैसे न दिल्यास तिला ठार करण्याची धमकी देऊन तिच्याकडून एक लाख रुपये खंडणी स्वीकारली.

सदर प्रकरणाची तक्रार रामनगर पोलिसांना प्राप्त होताच चारही खंडणीबाज पत्रकारांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्हयाचे तपासात रामनगर पोलिसांनी या चार पत्रकारांबाबत माहिती काढली असता ते चंद्रपूर शहरातील वेगवेगळया दैनिक न्युज पेपर, वेबपोर्टल न्युज व न्युज टी. व्ही. चॅनलचे संपादक, जिल्हा व तालुका प्रतिनिधी असल्याची माहिती झाली.

या चारही खंडणीबाज पत्रकारांना ताब्यात घेण्यात आले.

## संपादकीय ......

# वाजले बिगुल...

बिगुल वाजले याचा अर्थ आजच्या नवीन पिढीला अजिबात कळणार नाही. बिगुल वाजले याचा अर्थ कुठल्या तरी नवीन संघर्षाला किंवा युद्धाला सुरुवात झालेली आहे असा होतो. पूर्वीच्या काळी युद्धे आजच्यासारखी दिवस-रात्र खेळली जात नसत. युद्ध हे सकाळी साधारण आठ वाजता सुरू होत असे आणि संध्याकाळी सहा वाजता म्हणजे सूर्य मावळतीला गेल्यानंतर बंद होत असे. दरम्यानच्या काळात दोन्ही बाजूचे सैनिक सकाळचा नाष्टा करून तयार होऊन एकमेकांसमोर मैदानात येत असत आणि बिगुल वाजल्याबरोबर युद्ध सुरू होत असे.

आताच्या लोकशाहीच्या काळामध्ये निवडणुकांचा फक्त बिगुल वाजत असतो. निवडणुकांची घोषणा झाल्याबरोबर लोक तयारीला लागतात, किंबहुना पाच वर्षांपासून ते तयारीला लागलेले असतात. अनेकजण तर सदासर्वकाळ निवडणुकीच्याच झोनमध्ये असतात. किंबहुना खरा राजकारणी नेहमी दीर्घकाळच्या राजकारणाचा विचार करत असतो. तो त्यामुळे कधीच एका पंचवार्षिकपुरता विचार करत नाही. असो. आता सांप्रत काळातही जिल्हा परिषद आणि नगर परिषद निवडणुका येऊ घातल्या आहेत आणि त्यात सर्वप्रथम नगर परिषदांच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे.

या निवडणुकांसाठी गुडघ्याला बाशिंग बांधून अनेक उमेदवार उभे आहेत. गुडघ्याला बाशिंग बांधणे याचा अर्थ नवीन पिढीला कळणार नाही. 'गुडघ्याला बाशिंग' म्हणजे उतावीळ नवरे गुडघ्याला पूर्वी बाशिंग बांधत असत. म्हणजे लग्नामध्ये नवरदेवाला कपाळावर बाशिंग बांधून तयार करत असतात आणि समोर वधू आली की विवाह पार पडत असे. गुडघ्याला बाशिंग तयार ठेवण्याचे प्रकाराला गुडघ्याला बाशिंग लावले असे म्हणत. याचा अर्थ निवडणुका कधी एकदा लागतात यासाठी अनेकजण उतावीळ आहेत. तसे तर निवडणुकांची तयारी पाचही वर्षं सुरूच असते. ज्यांना अनेक वर्षं निवडणूक लढवायचा अनुभव आहे, ते लोक वर्षांनुवर्षं निवडणुकांची तयारी करत असतात. एखादा उमेदवार पराभूत झाला तर तो अधिकच पेटून उठतो आणि ही निवडणूक हरला तरी पुढची निवडणूक नक्कीच जिंकणार या तयारीने कामाला लागलेला असतो. पुन्हा असो. अशा निवडणुकांमुळेच जुने शब्द पुन्हा कानांवर पडतात.इतिहासातील आणखी एक असाच शब्द म्हणजे प्रत्येक निवडणुकीमध्ये निकराची लढाई होत असते. आपल्या सैनिकांना स्फुरण चढावे म्हणून रणदुंदुभी म्हणजेच नगारे वाजवितात, घोषणा दिल्या जातात. आजच्या लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रचार करणार्या रिक्षा, लागणारे बॅनर, येणार्या जाहिराती, होत असलेल्या प्रचार सभा हे रणदुंदुभीचे प्रकार आहेत. निकराची लढाई म्हणजे अटीतटीला आलेली लढाई, ज्यामध्ये सर्वात जास्त संघर्ष होत असतो. एकदाची निकराची लढाई जिंकली की जिंकले कोण आणि हरले कोण याचा फैसला होत असतो. आपल्या लोकशाहीतील या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका इतिहासाला साद घालणार्या आहेत यात शंका नाही.अमरावती जिल्ह्यात १०नगरपालिका व २नगरपंचायती साठी निवडणूक होणार आहेत.

# समस्या खांदा निखळण्याची...

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

मानवी शरीरातील सर्वात जास्त हालचाल करणारा सांधा म्हणजे खांद्याचा सांधा. या सांध्यात हाताच्या वरच्या हाडाचा (ह्यूमरस) गोलाकार भाग खांद्याच्या हाडातील (स्कॅप्युला) कपासारख्या पोकळीत बसलेला असतो. हा सांधा अत्यंत लवचिक असल्याने तो जागेवरून सुटण्याची (डिसलोकेट होण्याची) म्हणजेच निखळण्याची शक्यता अधिक असते. खांदा निखळल्यास ह्यूमरस हाड त्या कपातून बाहेर येते आणि खांदा विकृत दिसतो.




खांदा निखळल्याची शंका आल्यास तत्काळ वैद्यकीय मदत घेणे अत्यावश्यक आहे. योग्य उपचार घेतल्यास बहुतांश रुग्ण काही आठवड्यांत खांद्याचा पूर्ण वापर पुन्हा करू शकतात. मात्र, एकदा खांदा निखळल्यावर तो पुन्हा सुटण्याची प्रवृत्ती वाढते. विशेषतः वय जितके लहान असेल तितकी खांदा पुन्हा निखळण्याची (रिडिसलोकेशन) शक्यता अधिक असते. साधारणतः २० व्या वर्षापर्यंत ती ८५ टक्के इतकी असते.

**लक्षणे कोणती?**

खांदा जागेवरून हलणे किंवा विकृत दिसणे सूज येणे किंवा निळसर- काळसर डाग पडणे तीव्र वेदना जाणवणे हात हलवता न येणे किंवा सांधा हलवताना तीव्र वेदना होणे याखेरीज काही रुग्णांमध्ये हातात किंवा मानेत मुंग्या येणे, बधिरपणा किंवा अशक्तपणा जाणवतो. खांद्याभोवतालचे स्नायू आकसल्यामुळे वेदना आणखी वाढतात.

**काय करावे?** खांदा निखळल्याची शंका असेल, तर तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. तोपर्यंत खांदा हलवू नका. हात ज्या स्थितीत आहे, त्याच स्थितीत स्लिंग किंवा स्प्लिंटने स्थिर ठेवावा. खांदा जबरदस्तीने परत जागेवर बसवू नये. त्यामुळे हाडे, स्नायू, लिगामेंट्स, नसा किंवा रक्तवाहिन्या दुखावू शकतात. त्या भागावर बर्फाचा थंड पॅक लावल्यास सूज व वेदना कमी होतात.

**खांदा निखळण्याची कारणे काय?**

खांद्याचा सांधा शरीरातील सर्वाधिक डिसलोकेट होणारा सांधा आहे. कारण, त्याची हालचाल अनेक दिशांना होते. त्यामुळे खांदा पुढे, मागे किंवा खाली या तिन्ही दिशांनी निखळू शकतो. कधी पूर्णपणे, तर कधी अंशतः हाड कपातून बाहेर येते. बहुतेक वेळा खांदा पुढे (फॉरवर्ड) सटकण्याची शक्यता असते. यावेळी खांद्यातील लिगामेंटस् (हाडांना जोडणारे ऊतक) ताणले जातात किंवा फाटतात.

जोरदार धक्का बसणे किंवा खांद्याला अचानक झटका बसणे, हात अतिप्रमाणात फिरवणे यामुळे खांद्याचे हाड जागेवरून निघू शकते.

क्रिकेट, फुटबॉल, हॉकीसारख्या क्रीडा प्रकारांमध्ये किंवा जिम्नॅस्टिक्स, स्कीईंग, व्हॉलीबॉलसारख्या पडण्याची शक्यता असलेल्या खेळांमध्ये खांदा निखळण्याची समस्या सर्रास घडते. याशिवाय वाहन अपघातात खांद्यावर तीव्र धक्का बसल्यास हाड जागेवरून निघू शकते. तसेच जिना, शिडी किंवा ओल्या फरशीवरून पडताना खांदा चुकीच्या स्थितीत आपटल्यास डिसलोकेशन होऊ शकते. खांदा निखळण्याची शक्यता सर्वांनाच असते; मात्र ही दुखापत तरुण व्यक्तींमध्ये जास्त प्रमाणात दिसते.

खांदा निखळल्याने खांद्याचे स्नायू, लिगामेंटस् आणि टेंडन्स फाटणे किंवा ताण येणे, नसा किंवा रक्तवाहिन्या दुखावणे, पुन्हा पुन्हा खांदा सुटण्याची प्रवृत्ती वाढणे या समस्या उद्भवतात. खांद्यातील लिगामेंटस्, टेंडन्स किंवा नसा गंभीररीत्या दुखावल्यास शस्त्रक्रियेची आवश्यकता भासू शकते. खांदा सुटण्याची शक्यता कमी करण्यासाठी घरात किंवा कार्यस्थळी घसरट जागा टाळा. शिडी वापरताना काळजी घ्या.



खेळताना योग्य सुरक्षात्मक गिअर वापरा. खांद्यातील स्नायू आणि सांधे मजबूत ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करा. लवचिकता आणि स्थैर्य वाढवणारे व्यायाम विशेषतः महत्त्वाचे आहेत. एकदा खांदा निखळल्यावर, तो पुन्हा सुटू नये म्हणून डॉक्टरांनी सांगितलेले स्ट्रेन्थनिंग आणि स्टॅबिलिटी व्यायाम नियमितपणे करणे आवश्यक असते.

एकुणातच, खांदा निखळणे ही वेदनादायक पण उपचारयोग्य अवस्था आहे. योग्य उपचार, विश्रांती आणि व्यायाम यांचा समतोल साधल्यास खांदा पुन्हा पूर्ववत कार्यक्षम होऊ शकतो. मात्र, स्वतः खांदा बसवण्याचा प्रयत्न केल्यास कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते. त्यामुळे नेहमी वैद्यकीय मदत घ्यावी.

# पीकविमा योजनेतून सरसकट १७,५०० रुपये मिळणार का?

## कोणत्या निकषाआधारे ठरणार नुकसान भरपाई?

दि.६ विदर्भ प्रजासत्ताक १ खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारने ३१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. त्यात पीकविमा योजनेतून हेक्टरी साडेसतरा हजार रुपये देऊ, असे आश्वासन दिले होते.प्रत्यक्षात ही मदत महसूल मंडळातील पीककापणी प्रयोगातून आलेल्या सरासरी उत्पादनावर अवलंबून असणार आहे. मात्र, महसूल मंडळानुसार हे उत्पादन बदलणारे आहे.

त्यानुसार विमा कंपनी भरपाई देईल. त्यामुळे राज्य सरकारने जाहीर केलेली मदत शेतकऱ्यांनामिळेलच याची खात्री नाही.पीकविमा योजनेत ९० टक्के शेतकरी सोयाबीन उत्पादक असून, आतापर्यंत राज्यातील महसूल मंडळातील सुमारे ८२ टक्के पीक कापणी प्रयोगाचे प्रयोगातील उत्पादनाचे आकडे हाती आले आहेत.

सर्व अहवाल येण्यासाठी १५ डिसेंबरचा कालावधी लागेल. त्यानंतरची ही मदत देण्यात येईल. खरीपात पावसामुळे शेतकऱ्यांची स्वप्ने पाण्यात वाहून गेली.

सरासरी उत्पादन शून्य बोल्ड करणे मागे कलर बॉक्स

या सरासरीची गेल्या पाच वर्षांमधील सरासरी उत्पादनाशी (उंबरठा उत्पादन) तुलना केली जाणार आहे.

उंबरठा उत्पादनापेक्षा सरासरी उत्पादन कमी असल्यास संबंधित महसूल मंडळातील शेतकरी नुकसानभरपाईला पात्र असतील.

उदाहरणार्थ सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनाच्या १० टक्के कमी असल्यास विमा संरक्षित रकमेच्या दहा टक्केच भरपाई शेतकऱ्यांना मिळेल.

हे उत्पादन उंबरठा उत्पादनाच्या १०० कमी असल्यास अशांना संपूर्ण विमा संरक्षित रक्कम भरपाई म्हणून मिळेल.

सोयाबीनसाठी ही विमा संरक्षण रक्कम ५६ हजार रुपयांपर्यंत आहे.




संपूर्ण नुकसानभरपाई मिळण्यासाठी महसूल मंडळातील सरासरी उत्पादन शून्य असणे अपेक्षित आहे.

नुकसानभरपाई डिसेंबर अखेरच

सोयाबीन काढणीचा हंगाम संपल्याने महसूल मंडळांमध्ये पीक कापणी प्रयोग राबविण्यात आले आहेत.

आतापर्यंत राज्यातील ८२ टक्के महसूल मंडळांमधील पीक कापणी प्रयोगाचे आकडे कृषी विभागाकडे प्राप्त झाले आहेत.

उर्वरित १८ टक्के मंडळांमधील आकडेवारी ही १५ डिसेंबरपर्यंत प्राप्त होईल.

त्यामुळे योजनेतून शेतकऱ्यांना दिली जाणारी नुकसानभरपाई डिसेंबरअखेरच मिळू शकेल, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.


# उद्याला शास्त्री क्रीडांगणावर निनादणार भारतभूमीच्या गौरवाचा सूर

## हजारो विद्यार्थी एकाचवेळी गाणार 'वंदे मातरम'

### राष्ट्रीय गीत निर्मितीला १५० वर्षे पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अकोला-** स्वातंत्र्य सेनानी व थोर कवी बंकिमचंद्र चटर्जी यांनी क्रांतीची जाज्वल्य ज्योत आपल्या गीतातून सबंध देशभर पेटवली. 'वंदे मातरम' या गीत रचनेला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त स्थानिक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण मुलींची संस्था यांच्यामार्फत पं. लाल बहादूर शास्त्री क्रीडांगणावर दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वा. 'वंदे मातरम' गायनाचा सामूहिक सोहळा होणार आहे.




विद्यार्थी, तरुण, महिला, ज्येष्ठ अकोलेकरांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, आयुक्त डॉ. सुनील लहाने, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी संतोष साळुंके, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) येथील प्राचार्य शरदचंद्र ठोकरे आदी उपस्थित राहणार आहेत.यावेळी आदित्य केंदळे हे मार्गदर्शन करणार आहेत.

राष्ट्रीय गीत सामूहिक गायनाबरोबरच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे शिल्पनिदेशक तथा प्रसिद्धी समिती प्रमुख अरविंद पोहरकर यांनी दिली.

या कार्यक्रमाला अधिकाधिक अकोलेकरांनी प्रतिसाद द्यावा, असे आवाहन प्राचार्य संतोष साळुंके व प्राचार्य शरदचंद्र ठोकरे यांनी केले आहे.

# आयटीआयजवळ विद्यार्थ्यांमध्ये राडा; कोयत्याच्या वारात एक जखमी, प्रेमप्रकरणातून वादाची शक्यता



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

अमरावतीतील आयटीआय जवळ आज दुपारी विद्यार्थ्यांच्या दोन गटांमध्ये झालेल्या राड्यात एका विद्यार्थ्याला कोयत्याने वार करून जखमी करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, आयटीआयची सुट्टी झाल्यानंतर दोन विद्यार्थ्यांमध्ये वाद झाला. त्यात एका विद्यार्थ्याने कंबरेत लपवून आणलेला कोयता बाहेर काढत वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तात्काळ बचाव करताना वार हातावर घेतला गेला आणि तो थोडक्यात मानेवरून हुकला.

यानंतर तोच कोयता आरोपी विद्यार्थ्याने अभिषेक रायबोले या विद्यार्थ्याला मारला. यात अभिषेक जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रेमप्रकरणातून हा वाद उफाळल्याची प्राथमिक चर्चा आहे. पोलीस घटनेचा पुढील तपास करीत आहेत.

# ११ मेडिकल कॉलेजांत 'कार्डियाक कॅथलॅब'; हृदयविकारावरील उपचार होणार सुलभ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मुंबई**

गेल्या काही वर्षांत हृदयविकाराचे प्रमाण वेगाने वाढत असल्यामुळे या आजारावरील उपचाराकरिता आवश्यक असणारी कार्डियाक कॅथलॅब राज्यातील ११ वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालयांत सुरू करण्यात येणार आहे. राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर या कॅथलॅब सुरू करण्याची परवानगी दिली आहे. त्यात मुंबईतील गोकुळदास तेजपाल शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा समावेश आहे.

काही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत येणाऱ्या हृदयविकाराच्या रुग्णांची संख्या मोठी असते. त्या ठिकाणी दोन कॅथलॅब सुरू करण्यात आल्या आहेत. पीपीपी तत्त्वावर काढण्यात येणाऱ्या कॅथलॅबमध्ये कार्डियाक कॅथलॅब युनिट, नेस्थेशिया वर्क स्टेशन, इको मशीनसह इतर उपकरणांचा समावेश असेल.



या पीपीपी प्रकल्पाचा कालावधी १५ वर्षांचा राहील तसेच शासनाच्या पूर्वमान्यतेने तो कमाल पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल. सार्वजनिक-खासगी भागीदारीमध्ये खासगी सेवा पुरवठादाराकडून कॅथलॅब युनिटसाठी आवश्यक असणारी खरेदी, स्थापना तसेच सर्व संबंधित पायाभूत सुविधा उभारणीसाठी भांडवली गुंतवणूक करेल. या प्रकल्पासाठी आवश्यक जागा, वीज, पाणी, ऑक्सिजन पुरवठा आणि इतर मूलभूत सुविधा संबंधित संस्था उपलब्ध करून देईल.

### राज्यातील 'ती' महाविद्यालये कोणती?

गोकुळदास तेजपाल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मुंबई), स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (अंबाजोगाई), श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (धुळे), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (नागपूर), डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (नांदेड), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (गोंदिया) , शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मिरज), आरोग्य पथक (पालघर), छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सातारा), श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (यवतमाळ), बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (पुणे)

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ६ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# भाजपकडून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची तयारी जोरात सुरु

## खा. डॉ. अनिल बोंडे, प्रवीण पोटे, जयंत डेहनकर निवडणूक प्रमुख

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडून विशेष जबाबदारी






**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती** – भाजपने अमरावती जिल्ह्यात गेल्या विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळवले. त्यानंतर पुन्हा एकदा भाजपने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. अनिल बोंडे यांची जिल्ह्याच्या तर जयंत डेहनकर यांची शहर जिल्हा आणि माजी पालकमंत्री प्रवीण पोटे (मेळघाट) यांची निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडून त्यांना हि विशेष जबाबदारी देण्यात आली आहे.दहा नगरपरिषद दोन नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी महाराष्ट्र निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम लागू केला आहे. त्याप्रमाणे जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा बिगुल वाजला आहे.त्यासाठी भाजपने देखील कंबर कसली आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने जोरदार कामगिरी केल्यानंतर पुन्हा एकदा माजी कृषी मंत्री खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात भाजपने जिल्ह्यातनिवडणूकांचे रणशिग फुंकले आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी डॉ. अनिल बोंडे यांची अमरावती जिल्ह्याच्या निवडणूक प्रमुखपदी नियुक्ती केली आहे. तसेच शहर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी जयंत डेहनकर आणि मेळघाट ग्रामीणसाठी माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांच्याकडे निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी सोपविली आहे. या निवडीबाबत या तिघांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आभार मानले आहेत. या संदर्भात त्यांनी सांगितले की, स्थानिक स्तरावर बूथ पासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत भाजपचे संघटन अतिशय बळकट आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तळागाळातील कार्यकर्ता प्रचंड आशावादी आहे. कार्यकर्त्यांची निवडणूक असल्याने भाजप या सर्व निवडणुकांमध्ये मोठा विजय मिळवल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास खा. डॉ. अनिल बोंडे, प्रवीण पोटे आणि जयंत डेहनकर यांनी व्यक्त केले.

### जयंत डेहनकरांकडे शहराची जबाबदारी

प्रदेशाध्यक्ष रविद्रजी चव्हाण यांनी अमरावती शहर जिल्हा स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीसाठी प्रमुख म्हणून जयंत डेहनकर यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्या संघटन कौशल्याने आणि नेतृत्वाने पक्षाला निश्चितच बळ मिळेल, अशी अपेक्षाव्यक्त करीत त्यांना भाजप पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्यात. यावेळी भारतीय जनता पार्टी शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे, सुनील काळे, बादल कुलकर्णी, सचिन रासने, संजय नरवणे, ललित समदुरकर, राजू कुरिल आदी उपस्थित होते.

# चिखलदरा नगर परिषदेत मतदाता पर्च्यांमध्ये घोळ

## नाव एका मतदाराचे तर फोटो दुसऱ्याचा!



विदर्भ प्रजासत्ताकदि.६चिखलदरा : १३राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुका लवकरच पार पडणार आहेत. त्यानिमित्ताने चिखलदरा नगर परिषद क्षेत्रात मतदाता पर्च्यांचे वितरण सुरू झाले आहे. मात्र या पर्च्यांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. काही पर्च्यांमध्ये मतदाराचे नाव योग्य असतानाही फोटो मात्र इतर कुणाचा लावण्यात आला आहे, ज्यामुळे मतदारांत संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.चिखलदरा नगर परिषदेत १० प्रभाग असून, यामधून २० नगरसेवकांची निवड होणे अपेक्षित आहे. एकूण ३,३५५ मतदारांसाठी मतदाता पर्चीचे वितरण सुरू आहे. पण वितरणादरम्यान अनेक विसंगती समोर आल्या आहेत. उदाहरणार्थ, चव्हाण श्रीकृष्ण गोविंदराव यांच्या नावाच्या पर्चीवर मोहम्मद अशरफ हाफिज हबीब यांचा फोटो होता. तर चव्हाण चंदा श्रीकृष्ण यांच्या नावासोबत बदरुन्नीसा मोहम्मद अशरफ यांचा फोटो जोडला गेला. यासारख्या अनेक प्रकरणांत नाव आणि फोटो जुळत नाहीत.या घोळामुळे मतदार चक्रावले असून निवडणूक प्रक्रियेच्या अचूकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मतदार पर्ची व्यवस्थापनातील ही चूक तातडीने सुधारण्याची मागणी होत आहे.

# 'लालपरी' दिवाळीत लक्ष्मी रुपात पावली

## ९ दिवसांत अमरावती विभागाची तब्बल ३ कोटी २१ लाखांची कमाई

**विदर्भ प्रजासत्ताकदि.६अमरावती**

दिवाळीच्या उत्साहात यंदा 'लालपरी' आणि 'शिवाई' बसने अक्षरशः 'कॅश' कमावली ! अमरावती विभागातून फक्त नऊ दिवसांत तब्बल ११ लाख ६० हजार किलोमीटर अंतर पार करत राज्य परिवहन महामंडळाने ३ कोटी २१ लाख ५० हजार रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळवले आहे.

दिवाळी काळात (१८ ते २६ ऑक्टोबर) पुणे, नागपूर, अकोला, यवतमाळ, वर्धा आदी मार्गांवर तसेच जिल्ह्यांतर्गत जादा बसेस सोडण्यात आल्या, ज्यामुळे प्रवाशांना अखंड सेवा उपलब्ध झाली. अमरावती, बडनेरा, परतवाडा, दर्यापूर, चांदुर बाजार, मोर्शी, वरूड आणि चांदुर रेल्वे या आठ आगारांमधूनदिवसरात्र बससेवा धावत राहिली. सर्वाधिक अमरावती आगाराला (७६६.३२ लाख) मिळाले, तर परतवाडा, बडनेरा आणि दर्यापूर आगारांनीही उल्लेखनीय कामगिरी के ली. महत्वाचे म्हणजे, महिलांच्या प्रवासात ४० टक्के वाढ झाली असून, ५० टक्के सवलतीमुळे महिला प्रवासी अधिक प्रमाणात एसटी सेवेकडे आकर्षित झाल्या.यंदा ८.८८ टक्क्यांनी प्रतिकिलोमीटर उत्पन्नवाढ आणि गतवर्षीच्या तुलनेत तब्बल ३० टक्के अधिक कमाई नोंदवली गेली आहे. प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि नव्या लालपरी-शिवाई बससेवेमुळे यंदाची दिवाळी 'लक्ष्मी 'समान ठरली, असे अमरावती विभाग नियंत्रक निलेश बेलसरे यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांनी ई केवायसी, फार्मर आयडी नोंदणी करण्याचे आवाहन

# अमरावती विभागात अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांसाठी २,०३४ कोटीचा मदत निधी मंजूर

**- विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल**




विदर्भ प्रजासत्ताकदि.६अमरावती, : ४,५जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा, वाशिम जिल्ह्यांत अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून रब्बी हंगामाकरीता बियाणे व अनुषंगीक बाबींकरीता विशेष मदत पॅकेज अंतर्गत प्रति हेक्टरी दहा हजार रुपयेप्रमाणे (३ हेक्टरच्या मर्यादेत) अमरावती विभागाला २ हजार ३४ कोटीचा अतिरिक्त मदत निधी राज्य शासनाने मंजूर केला आहे. यासंदर्भात महसूल व वन विभागाने ४ नोव्हेंबर रोजी शासन निर्णय निर्गमित केला, अशी माहिती विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी दिली. विभागातील शेतकरी बंधुंनी या मदत प्राप्तीसाठी स्वत:च्या बँक खात्याची ई-केवायसी तसेच फार्मर आयडी काढून घ्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे आपत्ती उद्भवून शेतकऱ्यांच्या शेती व शेतीपिकांचे नुकसान तसेच मनुष्य व पशुहानी, मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय नैसर्गिक आपत्ती प्राधिकरणाच्या नियमानुसार बाधित शेतकऱ्यांना येत्या रब्बी हंगामामध्ये बियाणे खरेदी व अनुषंगीक बाबींसाठी विशेष मदत देण्यासाठी राज्य शासनाने अमरावती विभागाला मदत निधी मंजूर केला आहे. त्यानुसार अमरावती विभागातील २० लाख ८६ हजार ४४५ शेतकऱ्यांना एकूण २,०३४ कोटी ४३ लाख ४६ हजार रुपये इतका मदतनिधी वितरीत केला जाणार आहे.

सदर मदत निधी हा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट डीबीटी पोर्टलव्दारे वितरीत केला जाणार आहे. यासाठी यासंबंधी अचूक कार्यवाही होण्यासाठी संबंधित महसूल यंत्रणेला यापूर्वीच शासन निर्णयाव्दारे सूचना देण्यात आल्या आहेत. कार्यान्वयन यंत्रणांनी सर्व लाभार्थ्यांची माहिती विहित नमून्यात काळजीपूर्वक तयार करुन ती संबंधित अधिकाऱ्यांनी संगणकीय प्रणालीवर भरुन मान्यतेबाबतची कार्यवाही पूर्ण करावी. मदत देताना नैसर्गिक आपत्तीकरिता विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता होत असल्याचे खात्री करावी. तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मदत निधी बँकांनी कर्ज खात्यात अथवा अन्य वसुलीसाठी वळता करु नये, अशा सूचना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. मदतनिधीचा तपशील पुढीलप्रमाणे :

**अमरावती विभाग (बियाणे व इतर अनुषंगिक बाबी/कालावधी जून-सप्टेंबर २०२५)**

| | | |
|---|---|---|
| अमरावती जिल्हा : बाधित शेतकरी संख्या -२,२४,९१५ | बाधित क्षेत्र (हेक्टर)- १,८६,९०२.५ | निधी (रु.लक्ष)- १८६९०.२५ |
| अकोला जिल्हा : बाधित शेतकरी संख्या-३,५६,२२९ | बाधित क्षेत्र (हेक्टर)- ३,२३,४९६.८८ | निधी (रु.लक्ष)- ३२३४९.६८ |
| यवतमाळ जिल्हा : बाधित शेतकरी संख्या-५,२३,३४५ | बाधित क्षेत्र (हेक्टर)- ६,३८,१५८.१० | निधी (रु.लक्ष)- ६३८१५.८२ |
| बुलढाणा जिल्हा : बाधित शेतकरी संख्या-६,८५,३३८ | बाधित क्षेत्र (हेक्टर)- ६,१०,५७२.८० | निधी (रु.लक्ष)- ६१०५७.२८ |
| वाशिम जिल्हा : बाधित शेतकरी संख्या-२,९६,६१८ | बाधित क्षेत्र (हेक्टर)- २,७५,३०४.३२ | निधी (रु.लक्ष)- २७५३०.४३ |
| एकूण : बाधित शेतकरी संख्या-२०,८६,४४५ | एकूण बाधित क्षेत्र (हेक्टर)- २०,३४,४३४.६० | एकूण निधी (रु.लक्ष)-- २०३४४३.४६- |

# सहकारी संस्थांच्या निवडणुकांवरील स्थगिती उठविली

## राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचा आदेशआजपासून निवडणकांची रणधुमाळी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती–** राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने राज्यातील स्थगित सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. सहकारातील निवडणुका पुन्हा गुरुवारपासून (ता. सहा नोव्हेंबर) सुरू होणार आहे.

शासनाच्या ३० सप्टेंबर व ३१ ऑक्टोबर २०२५ च्या आदेशानुसार अतिवृष्टीमुळे पुढे ढकललेल्या निवडणुका आता ६ नोव्हेंबर २०२५ पासून पूर्वी ज्या टप्प्यावर थांबल्या होत्या. त्या टप्प्यापासून पुन्हा सुरू करण्यात येणार आहेत प्राधिकरणाचे हा आदेश जारी करण्यात आलेला आहे. या आदेशानुसार सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाच्या स्थगितीखालील संस्था वगळून सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका सुरू केल्या जाणार आहे. 'अ' व 'ब' वर्गातील संस्थांच्या निवडणुका मतदारयादी अंतिम झाल्यानंतर सुरू कराव्यात व निवडणूक कार्यक्रम प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करावा. 'क' वर्ग संस्थांना तालुका किंवा प्रभाग निवडणूक अधिकाऱ्या कडून मान्यता देण्यात येणार आहे. 'ड' वर्ग संस्थांनी विशेष सर्वसाधारण सभा घेऊन निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी, याकरिता १ नोव्हेंबर २०२५ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आली असून त्यानुसार तीन महिन्यांत मतदारयाद्या तयार कराव्यात, अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. सन २०२६ मध्ये निवडणुकीस पात्र संस्थांनी त्यांच्या समितीचा कार्यकाळ संपण्यापूर्वी नियमानुसार मतदारयाद्या तयार करून निवडणूक प्रक्रिया सुरू करावी. या आदेशानंतर राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीच्या हालचालींना पुन्हा वेग येणार आहे. जिल्ह्यात अशा चार संस्थांच्या निवडणुका या आदेशान्वये ठप्प झाल्या होत्या. या निवडणुकांची पुढील प्रक्रिया आता सुरू होणार आहे.

# गुन्हे शाखेची कारवाईः चोरीच्या वाहनांचे सुटे भाग विक्रेत्यांवर धाड, ३.२५ लाखांचा माल जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती** : अमरावती शहरात वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांचा तपास वेगाने पुढे नेण्यासाठी पोलीस आयुक्तांनी विशेष मोहीम राबवण्याचे आदेश दिल्यानंतर गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने लोहा बाजारातील 'भारत स्क्रैप' आणि 'शानू ओल्ड डिस्पोजल' या स्क्रॅप व्यवसायिकांवर छापे टाकले.

छाप्यादरम्यान मोठ्या प्रमाणात दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे सुटे भाग मिळून आले. मात्र, संबंधित व्यावसायिकांकडे खरेदी-विक्रीची कोणतीही कागदपत्रे वा स्क्रॅप परवानगीचे आदेश सापडले नव्हते भारत स्क्रैपचे मालक अब्दुल हफिज अब्दुल गणी यांच्या घराजवळ असलेल्या मोकळ्या जागेतून चार कागदपत्रेविना असलेल्या दुचाकी जप्त करण्यात आल्या.

एकूण ३ लक्ष २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन्ही स्क्रॅप व्यावसायिकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलीस आयुक्तालयाने सर्व स्क्रॅप व्यवसायिकांना इशारा देत खरेदी-विक्री व्यवहाराची पूर्ण कागदपत्रे अद्यावत ठेवण्याचे आवाहन केले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखेच्या पथकाने केली. पथकामध्ये स.पो.नि. मनीष वाकोडे, पोहवा सतिश देशमुख, फिरोज खान, प्रशांत मोहोड, मंगेश लोखंडे आणि इतर अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

# उद्याला पेसा क्षेत्रातील शिक्षक पदांसाठी समुपदेशन प्रक्रिया

## उमेदवारांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती–** अमरावती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत पेसा क्षेत्रातील शिक्षक पदांवरील रिक्त जागा भरण्यासाठी समुपदेशन प्रक्रिया उद्या शुक्रवार (दि. ७ नोव्हेंबर) सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह येथे ही प्रक्रिया पार पडणार आहे. पेसा क्षेत्रातील अनुसूचित जमाती, इतर प्रवर्गातील तसेच सर्वसाधारण क्षेत्रातील पात्र उमेदवारांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सतीश मुगल यांनी दिलेल्या माहितीनुसार एकूण १८३ पात्र उमेदवार या समुपदेशन प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. पात्र उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर https://zpam-ravati.gov.in प्रसिद्ध करण्यात आली आहे.उमेदवारांनी आपले नाव व क्रमांक तपासून निश्चित वेळेत उपस्थित राहावे, उमेदवार गैरहजर राहिल्यास प्रशासनाकडून एकतर्फी निर्णय घेण्यात येईल. समुपदेशनानंतर निवड झालेल्या उमेदवारांनी १०० रुपयांच्या स्टँप पेपरवर करारनामा सादर करणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.या प्रक्रियेसाठी संबंधित गट आपल्या शिक्षणाधिकाऱ्यांना कार्यक्षेत्रातील उमेदवारांना सर्व माध्यमांतून कळविण्याचे निर्देश देण्यात आले असून, पंचायत समिती धारणी व चिखलदरा येथील गट शिक्षणाधिकाऱ्यांना रिक्त पदांच्या अहवालासह उपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे.

# १० नोव्हेंबरपासून नामनिर्देशनपत्र स्विकारण्यास सुरुवात

## आयोगाच्या संदर्भानुसार निवडणूक कार्यक्रम जाहीर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील १० नगरपरिषद, २ नगरपंचायत अध्यक्ष आणि सदस्य पदाच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम – २०२५ जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिद्ध केला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भानुसार हा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील अचलपूर, अंजनगाव-सुर्जी, वरुड, दर्यापूर, मोर्शी, शेंदूरजना घाट, चिखलदरा, चांदूर रेल्वे, चांदूर-बाजार आणि धामणगाव-रेल्वे या नगरपरिषद आणि धारणी आणि नांदगाव खंडेश्वर या नगरपंचायतीची निवडणूक होणार आहे. जिल्हाधिकारी यांनी जाहीर केलेल्या सूचनेनुसार नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरिता कालावधी हा १०/११/२०२५ ते १७/११/२०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत राहणार आहे.

नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याचा कालावधी हा १०/११/२०२५ ते १७/११/२०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत राहणार आहे. रविवार आणि सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशनपत्रांची छाननी १८/११/२०२५ रोजी सकाळी ११ वाजेपासून होणार असून याच दिवशी वैधरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादीप्रसिद्ध करण्यात येणार आहे.

ते नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपील नसल्यास १९/११/२०२५ २१/११/२०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत राहणार आहे. अपील असल्यास वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून तीन दिवसाच्या आत जिल्हा न्यायाधीशाकडे अपील करता येईल. निवडणूक निर्णय अधिकारी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न करतील.

# जि.प. निवडणूक खर्च १४ लाख, पं.स. ६ लाख उमेदवारांना दिलासा; आयोगाने मर्यादा वाढवली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अचलपूर**

निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उमेदवारांसाठी निवडणूक खर्चाची मर्यादा वाढवली आहे. आता जिल्हा परिषद निवडणुकीतील उमेदवारांना ८ लाखांऐवजी १४ लाख रुपये, तर पंचायत समिती उमेदवारांना ३ लाखांऐवजी ६ लाख रुपये खर्च करता येणार आहेत. यामुळे उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

ही मर्यादा अनेक वर्षांपासून लागू होती. वाढत्या महागाईमुळे उमेदवारांना जुन्या मर्यादेत खर्च करणे कठीण होत होते. त्यामुळे निवडणूक खर्चाची मर्यादा वाढवण्याची मागणी सातत्याने केली जात होती. शासनाच्या विचाराधीन असलेल्या या मागणीला अखेर निवडणूक आयोगाने हिरवा कंदील दाखवला आहे.केवळ जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच नव्हे, तर महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती आणि ग्रामपंचायतींच्या उमेदवारांसाठीही खर्च मर्यादा वाढवण्यात आली आहे. आता महानगरपालिका उमेदवारांना ८ ऐवजी १४ लाख रुपये खर्च करता येतील. नगरपालिकेसाठी ही मर्यादा ७ लाखांवरून १२ लाख (अ वर्ग नगरपालिकेसाठी १४ लाख) करण्यात आली आहे. नगरपंचायतीच्या उमेदवारांना ४ ऐवजी ८ लाख रुपये खर्च करता येणार आहेत.

ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठीही नवीन मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ११ सदस्यांपर्यंतच्या ग्रामपंचायतीसाठी २ लाख रुपये, ११ ते १५ सदस्य संख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी ४ लाख रुपये, तर १६ किंवा त्याहून अधिक सदस्य संख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी ६ लाख रुपये खर्च करता येणार आहेत. पूर्वीची मर्यादा या रकमेच्या निम्मी होती.

निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उमेदवारांनी समाधान व्यक्त केले आहे.

# मांगिया-पानझरी रस्त्यावर ४० हजार रुपयांचे सागवान जप्त

## अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल, वन विभागाची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अचलपूर**

शिरजगाव कसबा येथील मांगिया-पानझरी पाणंद रस्त्यावरील एका पडिक जमिनीतून सुमारे ४० हजार रुपये किमतीचे सागवान जप्त करण्यात आले आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली. मात्र, सागवान लपवून ठेवणाऱ्या आरोपीचा शोध अद्याप लागलेला नाही, त्यामुळे अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परतवाडा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी डी.एच. वाळके यांना मांगिया-पानझरी पाणंद रस्त्यालगतच्या पडिक जमिनीत सागवान लपवून ठेवल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे, त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

मांगिया गावाबाहेर, मांगिया ते पानझरी पांधन रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या पडिक जमिनीवर हे सागवान लपवून ठेवलेले आढळले. जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये सागवानच्या १३ नगांचा समावेश आहे, ज्याचे एकूण घनमीटर ०.४१४ असून त्याची अंदाजे किंमत ३९ हजार ४२४ रुपये आहे.

या कारवाईनंतर वन विभागाकडून वनगुन्हा क्रमांक ००१८०/०४४८२ दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळी कोणताही आरोपी आढळून न आल्याने, या प्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास वनपाल व्ही. व्ही. कोवळे करत आहेत.

ही कारवाई उपवनसंरक्षक अर्जुना के. आर. आणि सहायक वनसंरक्षक ज्ञानेश्वर देसाई (कॅम्पा व वन्यजीव, अमरावती) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यात वनपरिक्षेत्र अधिकारी डी.एच. वाळके, वनपाल व्ही. व्ही. कोवळे, वनरक्षक एस.एन. भगत, वनमजूर बी.जे. चव्हाण आणि रोजंदारी मजूर पराग दातीर यांचा सहभाग होता.दरम्यान, अशा प्रकारचे अवैध प्रकार निदर्शनास आल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १९२६ वर संपर्क साधावा, असे आवाहन वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले आहे.

# एका क्लिकवर मिळणार योजनांची माहिती : ग्राम महसूल अधिकारी कामराज चौधरींचा एक नाविन्यपूर्ण उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६पुसद**

ग्राम महसूल अधिकारी पुसद खंड दोनचे तलाठी कामराज ब. चौधरी यांनी त्यांच्या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती एकाच ठिकाणी मिळावी यासाठी शासन माहितीची बोलकी भिंत या अंतर्गत बोलकी भिंत तयार केली आहे. त्या भिंतीवरील दिलेला क्युआर कोड स्कॅन केल्यावर शासनाच्या योजनाची माहिती एकाच ठिकाणी मिळते, त्यामुळे नागरिकांचा वेळ व पैशाची बचत होते. माहिती मिळवण्यासाठी विविध कार्यालयात जाण्याची आवश्यकता राहत नाही. याचे उद्घाटन दि. ४ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे.

शासन माहितीची बोलक्या भिंतीचे उद्घाटन ग्राम महसूल अधिकारी कार्यालय पुसद खंड दोन येथे उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल यांच्या हस्ते व तहसीलदार महादेव जोरवर यांच्या उपस्थितीत दि. ४ नोव्हेंबर करण्यात आले. क्युआर कोड स्कॅन केल्यावर नागरिकांना संजय गांधी निराधार अनुदान योजना, शेतकऱ्यांसाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, ग्रिस्टॅक योजना आणि फार्मर आयडी, कृषी विभाग योजना माहिती, दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजना, पीएमएफएमई अंतर्गत खाद्यपदार्थ प्रक्रिया अंतर्गत उद्योग, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना, बार्टी, सारथी, महाज्योती आदी अनेक योजनांची माहिती नागरिकांना विस्तृत स्वरूपात मिळणार आहे. शासन माहितीची बोलकी भिंत सतत अद्यावत होत राहणार असल्याने सर्व योजनांची माहिती मिळणार आहे.

शासन माहितीची बोलकी भिंत प्रकल्पाचा उद्देशात सामान्य नागरिकांना शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि शासकीय सुविधा यांची माहिती सहजपणे उपलब्ध करून देणे. नागरिकांना विविध कार्यालयांमध्ये वारंवार जावे लागू नये आणि त्यांचा वेळ, श्रम व खर्च वाचावा हा प्रमुख हेतू आहे. सदर योजनेच्या उद्घाटनास मंडळ अधिकारी मयूर मस्के, तलाठी नीलांजन वानखेडे, गजानन क्वाणे, राहुल खाडे, गोपीनाथ झोले व महसूल सेवक रोहन बिडकर आदी उपस्थित होते.

# नगरपरिषद निवडणुकीत मुस्लिम मत निर्णायक

## उर्दू महाविद्यालयाचा मुद्दा राजकीय गणित बदलणार दुर्लक्षाचा मुद्दा ठरणार उमेदवारांसाठी डोकेदुखी!




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६चांदूर रेल्वे**

चांदूर रेल्वे नगरपरिषद निवडणुकीची घोषणा होताच, शहरातील उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांचा जुना प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. 'उर्दू माध्यमाचे ११ वी व १२ वीचे महाविद्यालयीन शिक्षणसुरूकरा' यामागणीवर आता मुस्लिम समाज ठामझाला आहे.

अनेक वर्षांपासून स्थानिक नागरिक आणि पालक अकरावी बारावीच्या उर्दू शिक्षणासाठी धडपडत आहेत. शहरातील मौलाना अबुल कलाम आजादउर्दू शाळेत दहावीपर्यंत शिक्षणमिळते; मात्र त्यापुढे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागते. अनेक विद्यार्थ्यांची कारकीर्द यामुळे अर्धवट राहते आणि समाज शैक्षणिकदृष्ट्या मागे पडत चालला आहे. शहरातील मुस्लिम मतदारसंख्या सुमारे २७०० मतांपर्यंत असून, ती नगरपरिषद निवडणुकीतकिंगमेकर ठरू शकते. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत उर्दू महाविद्यालयाचा प्रश्न सर्वाधिक प्रभावी मुद्दा ठरणार आहे, अशी चर्चा शहरात रंगली आहे. गेल्या २१ वर्षांच्या राजकीय कार्यकाळातही हा प्रश्न न सुटल्याने असंतोष वाढला आहे. माजी आमदार असोतवा विद्यमान आमदार दोघांनीही या प्रश्नावर ठोस पावले उचलली नाहीत, अशी टीका नागरिकांतून होत आहे. तब्बल पंधरा वर्ष मतदारसंघाचे नेतृत्व करणारे व आताचे माजी आमदारांच्या कार्यकाळातही हा प्रश्न प्रलंबित राहिला. यानंतर मुस्लिम समाजाने आमदार प्रताप अडसड यांना दोन ते तीन वेळा निवेदन दिले, चर्चाही झाली, पण प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र शून्यच राहिली. शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधायची असताना उर्दू विद्यार्थ्यांना अद्यापअकरावी-बारावीच्या शिक्षणापासून वंचित राहावे लागणे, हा दुर्दैवाचा आणि उपेक्षेचा विषय असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. आता येत्या २ डिसेंबरच्या नगरपरिषद निवडणुकीत, हा प्रश्न केवळ शैक्षणिक नव्हे तर राजकीय गणित बदलणारा हॉट इश्यू ठरणार आहे. मुस्लिम समाज एकवटल्यास, उर्दू महाविद्यालयाचा मुद्दा अनेक उमेदवारांची समीकरणेच पालटू शकतो, अशी चर्चा शहरभर जोरातसुरू आहे. शिक्षणापासून वंचित राहिलो, पण आवाज आता थांबणार नाही असे म्हणत मुस्लिम समाजाने उर्दू महाविद्यालयाचा ठाविक निर्णय घेणाऱ्या उमेदवारालाच समर्थनमिळण्याची शक्यता आहे.

# नवजात बाळांना नदीत सोडण्याची प्रथा

## भैसदेहीत कार्तिक पौर्णिमेपासून यात्रेला सुरुवात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ चुर्णी मेळघाट**

जगाबरोबरच देशही विज्ञानाच्या क्षेत्रात दिवसेंदिवस प्रगती करत आहे, पण परंपरांना फारसा फरक पडत नाही. शहर असो वा गाव आजही अनेक कुटुंबांमध्ये प्रथा व परंपरा पाळल्या जात आहेत. राज्याच्या सीमेपासून चाळीस किलोमीटर अंतरावर बैतूल जिल्ह्यातील भैसदेहीमध्ये नदीच्या पाण्यात काळजाचा तुकडा टाकण्याची अनोखी परंपरा पाळली जात आहे. ही परंपरा किती जुनी आहे, हे स्पष्ट झाले नसले तरी अनेक वर्षांपासून ती सुरू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

भैसदेहीच्या पूर्णा नदीवर कार्तिक पौर्णिमेपासून १५ दिवस चालणार्या या जत्रेत शेकडो नवजात बाळांना नदीच्या प्रवाहाच्या मध्यभागी पाळणामध्ये सोडले जाते आणि काहीवेळाने बाहेर काढले जाते. यामागील तर्क असा आहे की, येथे नवस केल्याने अपत्यप्राप्ती होते. यासाठी ही परंपरा अनेक काळापासून सुरु आहे. दरवर्षी कार्तिक पौर्णिमेला मोठी यात्रा भरते. मेळयात मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधून अपत्यहीन जोडपी नवसाची प्रार्थना करण्यासाठी येतात आणि नवस पूर्ण झाल्यानंतर तो फेडायला येतात. नरेश आणि राणी हे महाराष्ट्रातील जोडपे सांगतात की, त्यांना पूर्णा मातेकडून मुलाची इच्छा होती. नवस केल्यानंतर त्यांच्या अंगणात समृद्धी आली आणि आता त्यांची इच्छा पूर्ण झाली आहे. बाळाला पाळण्यातून नदीच्या पाण्यात सोडताना भीती वाटत होती का? या प्रश्नावर ते म्हणाले की पूर्णा माईच्या कृपेने मला मुलाचा आशीर्वाद मिळाला. त्यामुळे त्यांच्या मनात कोणत्याही प्रकारची भीती नाही. मुलाची इच्छा पूर्ण झाल्यावर लोक येथे येतात. मॉ पूर्णा नदी भैसदेही जवळ आहे. बैतुल जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ६५ किमीवर पूर्णा नदी असून तिला चंद्रपुत्री म्हणजेच चंद्राची कन्या म्हणतात. ती भैसदेही शहराजवळ उगम पावते. कार्तिक महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी अपत्यहीन जोडपी आणि लोक सुख-समृद्धीच्या आशेने जत्रेत येतात. चंद्रपुत्री नावाच्या पूर्णा नदीच्या उगमामागे अनेक पौराणिक कथा आहेत. काहींच्या मते हे सप्तऋषींच्या उपासनेचे फलित आहे तर काहींच्या मते या भागात दुष्काळ पडल्यानंतर एका राजाच्या तपश्चर्येमुळे भगवान शिवाने पूर्णाचा अवतार घेतला होता. एकेकाळी नदी दुधाच्या प्रवाहाप्रमाणे वाहत असेही सांगितले जाते.

# सोयाबीन व कापसाला कवडीमोल भाव; खरेदी केंद्रांचा अडथळा, शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६वरुड**

वरूड तालुक्यात कापूस व सोयाबीनचे शासकीय खरेदी केंद्र अद्याप सुरू न झाल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. निसर्गाच्या रौद्ररुपासोबतच शासनाच्या उदासीन धोरणांमुळे शेतकरी हताश झाले आहेत. सध्या चांगल्या प्रतीच्या कापसाला ६,५०० ते ६,६०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत असला, तरी खरेदी केंद्रांअभावी शेतकऱ्यांना खासगी व्यापाऱ्यांकडे ट्रॅक्टरने माल घेऊन जावे लागत आहे.

सोयाबीनबाबतही परिस्थिती गंभीर आहे. व्यापारी मनमानी दर सांगत असून, चांगल्या प्रतीच्या सोयाबीनलाही प्रतिक्विंटल फक्त ४ हजार रुपये भाव येतो. त्यातही १५ ते २० टक्के ओलावा (मॉइश्चर) वजा करून अंतिम भाव ३,००० ते ३,२५० रुपयांवर येतो. शिवाय ४० किलोच्या पोत्यात ४ ते ५ किलो वजन कमी दाखवण्याचाही प्रकार सुरू असल्याने शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे.शासकीय खरेदी केंद्रे मंजूर असूनही एकाही ठिकाणी कार्यरत नसल्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे, तर खासगी व्यापाऱ्यांचा मात्र चांगलाच फायदा होत आहे. परिणामी, लागवड खर्चही वसूल न होणाऱ्या परिस्थितीत शेतकऱ्यांची दिवाळी अंधारातच गेली आहे.

# शेतमजूर कन्या बनली सहआयुक्त

## माधानच्या कस्तुरबा आश्रमातील विद्यार्थिनी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६चांदुर बाजार**

परिस्थिती कितीही प्रतिकूल असो परंतु, बुद्धिमत्तेला परिश्रमाची जोड लाभल्यास असामान्य कर्तृत्व घडल्याशिवाय राहत नाही. असेच असामान्य कर्तृत्व घडवले आहे, तालुक्यातील सोनोरी येथील रहिवासी व श्री क्षेत्र माधान येथील कस्तुरबा कन्या आश्रमशाळेत शिकणारी लीला बाजीराव इवने या आदिवासी कन्येने! तिची नुकतीच समाज कल्याण विभागात सहआयुक्त सारख्या अतिशय महत्त्वाच्या पदावर नियुक्ती झाली आहे.

लीला आदिवासी कुटंबातील तर आई शेतमजूर व घरी अठराविश्व दारिद्र्य अशी स्थिती आहे. घरात शिक्षणाचा अभाव तरी लहानपणापासून लीलाला शिक्षणाची आवड होती. त्यामुळे शिक्षण तिला स्वस्थ बसू देत नव्हते. शिक्षण घेण्याकरिता तिने शेतात मोलमजुरीचे कामे करीत प्राथमिक शिक्षण सोनारी येथील शाळेत घेतले. पुढील शिक्षणाकरिता थोर समाजसेविका ताराबेन मशरूमवाला यांच्या कस्तुरबा आश्रम माधान येथील वसतिगृहात ती दाखल झाली. ज्या ताराबेनने महिला आणि बालकल्याणासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले, त्यांच्या आश्रमाच्या संस्कारात ती वाढली व मोठ्या जिद्द, अपार कष्टाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेमध्ये अफाट यश प्राप्त केले.तिची नुकतीच नियुक्ती समाज कल्याण विभागात सहआयुक्त सारख्या अतिशय महत्त्वाच्या पदावर झाली आहे. लीलाचा शिक्षणाचा खडतर प्रवास, खरे तर स्पर्धा परीक्षेची तयारी करणार्या विद्यार्थ्याकरिता प्रेरणादायी उदाहरण आहे.इच्छाशक्ती आणि चिकाटी असेल तर कोणतेही ध्येय साध्य करता येते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. तिच्या या यशाबद्दल कस्तुरबा आश्रम माधान येथील संस्थेचे पदाधिकारी व कस्तुरबा माध्यमिक शाळेचे शिक्षक आदींनी तिचे अभिनंदन केले. शिक्षकांनी तिचा घरी जाऊन सत्कार केला. एका निरक्षर व मजुरी करणार्या मातेची कन्या उच्च पदावर पोहोचल्याबद्दल सर्वांना तिचा सार्थ अभिमान वाटत आहे.

# सांग रे भाऊ, निवडणूक आली 'कोणता झेंडा हातात घेऊ'?

## उमेदवारांच्या आधी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह अधिक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**



नुकतीच नगर परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. येत्या १० तारखेपासून नामांकन अर्ज दाखल करण्यात येणार आहेत. संभाव्य उमेदवारांपेक्षा कार्यकर्त्यांमधील उत्साह शिगेला पोहोचला आहे. भाऊ कोणत्या पक्षाकडून उमेदवारी मागणार आहेत. ती मिळाली नाही तर आणखी कोणत्या पक्षाकडे भाऊ उमेदवारी मागू शकतात, याकडे कार्यकर्त्याचे लक्ष लागले आहे. संभाव्य उमेदवाराला कार्यकर्त्याकडून विचारणा होत आहे की, 'सांग रे भाऊ, कोणता झेंडा हातात घेऊ.' त्यामुळे नागरिकांमध्येही उत्सुकता असून, येत्या तीन-चार दिवसात चित्र स्पष्ट होणार आहे.

निवडणुकीचा नगर परिषद निवडणुकीत प्रमुख पक्षांसह अनेक लहान लहान पक्षदेखील आपले उमेदवार उभे करणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी आपापल्या पक्षांकडे अर्ज दाखल केले आहेत. अध्यक्षपद ना. मा. प्र. राखीव असल्याने अनेकजण गुडघ्याला बाशिंग बांधून आहेत. तर एकूण ११ प्रभागांतून २३ नगरसेवक निवडून द्यायचे असल्याने इच्छुकांची भाऊगर्दी होणार आहे.

इच्छुकांनी आपल्या पक्षाकडे उमेदवारी मिळावी म्हणून आग्रह धरला आहे. आचारसंहिता लागू होताच पक्षांतर्गत हालचालींना वेग आला आहे. सध्या चाचपणी सुरू असलेल्या अर्जातील योग्य उमेदवार कसा निवडता येईल, याची पक्षश्रेष्ठी शहानिशा करून उमेदवार निश्चित करणार आहेतत्यामुळे उमेदवारी न मिळाल्यास काही जण अपक्ष तर काही जण दुसऱ्या पक्षांकडे उमेदवारी मागू शकतात, अशी शक्यता आहे. त्यामुळे आत्तापासूनच कार्यकर्त्यांमध्ये कमालीची उत्सुकता पाहायला मिळत आहे. भाऊ नेमके कोणत्या पक्षाकडून उभे राहतील, याचाअंदाज घेत कार्यकर्त्यांमधून 'कोणता झेंडा हाती घ्यावा लागेल?' असा प्रश्न विचारला जात आहे.

# शिक्षक बदल्यांचा निर्णय अखेर जिल्हा पातळीवर

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडेच सर्वाधिकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**




'शिक्षक बदल्यांबाबत आलेल्या या नवीन शासन निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. यामुळे बदली प्रक्रिया वेळेत आणि पारदर्शकपणे पूर्ण होईल. ३१ मेपूर्वी सर्व शिक्षकांची बदली होऊन शाळा सुरू होण्यापूर्वी म्हणजेच १५ जून व विदर्भात २३जूनपूर्वी सर्व शिक्षक आपल्या नवीन ठिकाणी कार्यरत असतील. जुन्या पद्धतीमुळे शिक्षण प्रक्रिया, विद्यार्थी आणि शिक्षक तिघांच्याही कामकाजात गोंधळ निर्माण झाला होता.

**–राजेश सावरकर,**
**राज्य प्रसिध्दी प्रमुख,प्राथमिक शिक्षक समिती**

जिल्हा परिषद शिक्षक बदल्यांच्या अधिकाराचा प्रश्न गेल्या काही वर्षांपासून शिक्षक संघटनांसाठी तसेच प्रशासकीय यंत्रणेसाठी डोकेदुखी ठरला होता. अखेर ग्रामविकास विभागाने ४ नोव्हेंबर रोजी जारी केलेल्या पत्राद्वारे या संदर्भात मोठा निर्णय घेत, शिक्षक बदल्या आता जिल्हा परिषद सीईओ यांच्या अखत्यारीतच राहतील, हे स्पष्ट केले आहे. राज्यभरातील शिक्षकांनी स्वागत केलेल्या या निर्णयामुळे जिल्हा पातळीवरील अधिकार पुनर्स्थापित होऊन बदल्यांची प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ आणि वेळेत पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.पूर्वी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडेच बदल्यांचे अधिकार होते. मात्र, काही वर्षांपूर्वी बदल्यांची प्रक्रिया पूर्णतः राज्य स्तरावर केंद्रीकृत करण्यात आली होती. ग्रामविकास मंत्रालयाकडून थेट प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या करण्यात येत होत्या. ही प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीची ठरल्याने मोठ्या प्रमाणावर गैरसोय निर्माण झाली. विन्सिस आयटी कंपनीच्या सॉफ्टवेअरमुळे अनेक अडचणी आल्या; अर्ज सादरीकरण, प्राधान्यक्रम तपासणी आणि याद्या प्रसिद्धीमध्ये त्रुटी निर्माण झाल्या. यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष वाढला आणि अनेकांनी न्यायालयात धाव घेतली.राज्य स्तरावरून होणाऱ्या बदल्यांमध्ये पारदर्शकतेचा अभाव, तांत्रिक चुका आणि अन्यायकारक याद्यांमुळे ग्रामविकास विभागाला वारंवार प्रतिज्ञापत्र सादर करावे लागले. अखेर या सर्व घोळाची दखल घेत ग्रामविकास विभागाने शिक्षक बदल्यांच्या प्रक्रियेतील स्वतःचा हस्तक्षेप मागे घेतला आहे. आता विभागाचे काम केवळ धोरणात्मक मार्गदर्शनापुरते मर्यादित असेल. या निर्णयामुळे येत्या शैक्षणिक वर्षासाठी म्हणजेच २०२५-२६ साठीची बदलीप्रक्रिया ३१ मेपूर्वी पूर्ण होऊन १५ जूनपूर्वी शिक्षकांना त्यांच्या नवीन ठिकाणी रुजू होता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या बदल्यांमुळे शिक्षणाचा दर्जा आणि शिक्षकांची स्थैर्यभावना दोन्ही जपले जातील, असा विश्वास शिक्षण क्षेत्रात व्यक्त होत आहे.

# पाच लाखांची विहीर दोन लाखांत कशी होणार साहेब? मनरेगात दोन लाखांची मर्यादा : ग्रामीण मजूर आणि शेतकऱ्यांमध्ये आक्रोश

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**




ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी उपजीविकेचा आधार ठरलेली मनरेगा योजना आता आर्थिक मर्यादांच्या कात्रीत सापडली आहे. केंद्र सरकारने नव्या मार्गदर्शक सूचनांद्वारे वैयक्तिक लाभाच्या कामांवरील खर्चाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित केली आहे. यामुळे विहीर, फळबाग, गोठा शेड, जलसंधारणाची कामे थांबण्याच्या मार्गावर आहेत. खर्चात पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने घेतलेल्या निर्णयाने मात्र ग्रामीण मजूर आणि शेतकऱ्यांमध्ये संताप उसळला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची समस्या लक्षात घ्यावी.ग्रामीण मजुरांच्या म्हणण्यानुसार, वैयक्तिक कामांमध्ये विशेषतः विहिरींच्या बांधकामासाठी सध्याच्या बाजारभावानुसार किमान पाच लाख रुपयांहून अधिक खर्च येतो. शासनाने ठरवलेली केवळ दोन लाखांची मर्यादा व्यवहार्य नसल्याने अनेक अपूर्ण कामे थांबण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दोन लाखांत ना विहीर उभी राहते, ना पाण्याची व्यवस्था होते. शासनाने ग्रामीण भागातील प्रत्यक्ष वास्तव पाहून निर्णय घ्यावा, अशी मागणी लाभार्थी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.


**ग्रामीण विकासाला धक्का**

मनरेगाने शेतकऱ्यांच्या जमिनी विकसित झाल्या, जलसंधारणाच्या कामांनी सिंचन सुधारले आणि रोजगारनिर्मिती झाली. परंतु दोन लाखांच्या मर्यादेमुळे या योजनेचा वेग कमी होण्याची शक्यता आहे. ग्रामीण विकासावरील परिणाम टाळण्यासाठी लाभार्थ्यांच्या मागणीनुसार केंद्राने पुन्हा निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

# श्री अंबादेवी संगीत सेवा समारोह २१ नोव्हेंबरपासून

## प्रसिद्ध गायक व वादक लावणार हजेरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**




गत १८ वर्षांपासून अव्याहत सुरू असलेला श्री अंबादेवी संगीत सेवा समारोह यंदा २१ ते २३ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. शास्त्रीय संगीताला समर्पित ह्या संगीत समारोहात यापूर्वी अनेक दिग्गज कलाकारांनी आपली सेवा श्री अंबादेवी चरणी अर्पित केली आहे. यंदाच्या समारोहात शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात सायंकाळी ६.३० वाजता पं. रघुनंदन पणशीकर, पुणे यांचे गायन तर दुसर्या सत्रात रात्री ८.३० वाजता कोलकाता येथील सुश्री रागेश्री दास या टप्पा, कजरी, ठुमरी, दादरा या दुर्मिळ होत चाललेल्या गानप्रकाराला सादर करतील.

दुसर्या दिवशी शनिवार २२ नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात सायंकाळी ६.३० वाजता धारवाड येथील सुप्रसिध्द पं. कुमार मरडूर यांचे गायन होईल. तर त्याच दिवशी दुसर्या सत्रात रात्री ८.३० वाजता आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सतारवादक पं. पूर्वायन चॅटर्जी यांचे सतारवादन होईल. त्यांना तबला संगत प्रख्यात तबलावादक श्री ओजस अढिया हे करतील. दोघांचे सवाल जवाब हे विशेष आकर्षण असेल. तिसर्या दिवशी रविवार २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता दक्षिणेतील विख्यात गायिका जुळ्या बहिणी सुश्री रंजनी व गायत्री यांचे गायन होईल. तर अंतिम सत्रात रात्री ८.३० वाजता आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तबलावादक पं. अनिंदो चॅटर्जी व त्यांचे चिरंजीव अनुव्रत चॅटर्जी यांचे तबला सहवादन सादर होईल. संस्थानच्या श्री अंबादेवी कीर्तन सभागृहात होणार्या या निःशुल्क संगीत सेवा समारोहाला रसिकांनी दरवर्षी प्रमाणे भरभरून प्रतिसाद द्यावा, अशी विनंती श्री अंबादेवी संस्थान विश्वस्त मंडळाने केली आहे.

# अकोल्यात कपडा बाजारातील जेजे मॉलला पहाटे भीषण आग

## सुदैवाने जीवितहानी टळली, ५० ते ६० लाख रुपयांचे नुकसान; व्यापाऱ्यांत भीतीचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अकोला**



अकोला शहरातील व्यावसायिक दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या कपडा बाजारात आज पहाटे भीषण आगीची घटना घडली. सकाळी अंदाजे तीनच्या सुमारास जेजे मॉल मध्ये लागलेल्या या आगीने काही मिनिटांतच विक्राळ रूप धारण केले. पहाटेच्या शांत वातावरणात अचानक उठलेल्या आगीच्या लोटांनी परिसरात गोंधळ उडाला. आग इतकी प्रचंड होती की काही क्षणांतच संपूर्ण इमारतीतून धुराचे लोट उठले आणि आकाश काळवंडून गेलं. या घटनेने व्यापाऱ्यांत भीतीचं वातावरण निर्माण झालं असून, अनेकांनी आपली दुकाने वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू केले, मात्र ते व्यर्थ ठरले.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. आग विझवण्यासाठी पाच अग्निशमन गाड्यांचा वापर करण्यात आला. जवळपास दोन तासांच्या कठोर प्रयत्नानंतर दलाला आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलं. अग्निशमन विभागाच्या मते, आग मॉलच्या वरच्या मजल्यावरून सुरू झाली आणि काही क्षणांतच ती संपूर्ण इमारतीत पसरली. मॉलमध्ये मोठ्या प्रमाणात कपड्यांचा साठा, फर्निचर आणि इतर साहित्य असल्याने आगीने जोर पकडला. दरम्यान, परिसरातील काही व्यापाऱ्यांनी स्वतःच्या दुकानांतील माल सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला, पण आगीच्या तीव्रतेमुळे आत प्रवेश करणे अशक्य झाले.

प्राथमिक अंदाजानुसार या आगीत सुमारे ५० ते ६० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. जेजे मॉलमधील अनेक दुकाने संपूर्णपणे जळून खाक झाली आहेत. काही ठिकाणी धातूंची चौकट आणि फर्निचरचे अवशेषच उरले आहेत. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आग लागली तेव्हा मॉलमधील सर्व दुकाने बंद होती आणि परिसरात फार कमी लोकांची वर्दळ होती. यामुळे मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली असली तरी जीवितहानी टळल्याने व्यापाऱ्यांनी दिलासा व्यक्त केला आहे. अनेकांनी मात्र आपले संपूर्ण भांडवल आणि साठा आगीत गमावल्याची खंत व्यक्त केली आहे.

# भाजपासोबत युवा स्वाभिमान पक्षाचे गटबंधन

## आगामी निवडणुकांसाठी रणनीती आखली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

युवा स्वाभिमान पक्षाची राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा कार्यकारिणीची संयुक्त बैठक पक्षाच्या मुख्य कार्यालयात उत्साहात पार पडली. येणाऱ्या नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या बैठकीत विविध महत्त्वाच्या निर्णयांना अंतिम स्वरूप देण्यात आले.

या बैठकीत भाजपासोबत गटबंधन कायम ठेवत, भाजपाच्या नगराध्यक्ष आणि युवा स्वाभिमान पक्षाच्या नगरसेवकांना निवडणून आणण्यासाठी समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या उद्देशाने प्रत्येक तालुक्यात २० पदाधिकाऱ्यांची स्वतंत्र निवडणूक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून ती समिती लवकरच घोषित होणार आहे.यावेळी इच्छुक उमेदवारांकडून आलेल्या अर्जांचा आढावा घेऊन प्राथमिक छाननी करण्यात आली. अंजनगाव सुर्जी, अचलपूर, चांदूरबाजार, चांदूर रेल्वे, चिखलदरा, दर्यापूर, धामणगाव रेल्वे, मोर्शी, शेंदुरजना घाट, वरुड, धारणी, नांदगाव खंडेश्वर या नगर परिषद व नगरपंचायतींमध्ये होणाऱ्या निवडणुकांबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

राष्ट्रीय अध्यक्ष नीलकंठराव कात्रे, ज्येष्ठ मार्गदर्शक सुनील राणा, अँड. नंदेश अंबाडकर, जयंतराव वानखेडे, शैलेंद्र कस्तुरे, संजय मुनोत, कमलकिशोर मालानी, निलेश कुलकर्णी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या बैठकीत पक्षाच्या संघटनात्मक बळकटीकरणासोबतच निवडणुकीतील रणनीती विषयक मार्गदर्शन करण्यात आले.सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी पक्षाच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी एकदिलाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# करडईचे तेल तब्बल ४०० रुपये किलो तरीही जिल्ह्यात पेरणीचे क्षेत्र का वाढेना?

## कीड, विविध रोगांचा होती करडईवर प्रादुर्भाव पक्षाच्या त्रासामुळे शेतकरी फिरवतात पाठ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**




आरोग्यासाठी लाभदायक आणि कोलेस्ट्रॉल कमी करणारे म्हणून ओळखले जाणारे करडईचे तेल सध्या उच्चकी दरावर पोहोचले आहे. जिल्ह्यात घाण्यावरील शुद्ध करडईचे तेल ४०० रुपये किलो दराने विकले जात असून, काही ठिकाणी किरकोळ बाजारात ३०० रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

जिल्ह्यात दरवर्षीच करडईचे पेरणी क्षेत्र घटत आहे. अवकाळी पाऊस, कीड, रोगांचा प्रादुर्भाव, पक्ष्यांचा त्रास व काढणीसाठी मजुरांचा अभाव त्यामुळे शेतकरी करडईऐवजी हरभरा, गहू व ज्वारीसारख्या पर्यायी पिकांकडे वळत आहेत. करडईचे उत्पादन कमी झाल्याने पुरवठा घटला, परिणामी तेलाचे दर झपाट्याने वाढले आहेत. करडईचे उत्पादन घटले आहे. तसेच शुद्ध, कोल्ड प्रेस्ड तेलाला वाढती मागणी आहे. बाजारात करडईचा पुरवठा कमी असल्यामुळे तेलाची दरवाढ झाली आहे.

### सहा महिन्यांत किलोमागे १०० रुपयांची वाढ

करडईचे उत्पादन घटल्याने तेलाचे भाव वाढण्याची शक्यता आहे. दिवसेंदिवस पेरणी क्षेत्रात कमी येत आहे. करडई पिकांना शेतकरी टाळाटाळ करतात. पीक काढणीला मजूर मिळत नसल्याचे प्रमुख कारण आहे.

### करडई ठरत आहे कालबाह्य

दशकापूर्वी जिल्ह्यात करडईचे क्षेत्र चांगले होते. मात्र, कीड व रोगांचा प्रादुर्भाव शिवाय काढणीच्या हंगामात करडईसाठी मजूर मिळत नाहीत. त्यामुळे जिल्ह्यात करडई पेरणीकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येत नाही.

### आरोग्यासाठी गुणकारी

करडईच्या तेलात कोलेस्ट्रॉल कमी करण्याचे गुणधर्म आहेत. त्यातील ओमेगा-६ फॅटी ॲसिड रक्तातील चरबीचे प्रमाण कमी करते.

# अंड्या पाठोपाठ केळीची फाईल लंपास; धारणी आदिवासी विकास कार्यालयातील प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मेळघाट**

धारणी एकात्मिक आदिवासी प्रकल्पाच्या कार्यालयातील ९० लक्षाची अंडा पुरवठ्याची फाईली चोरीला गेल्याच्या घटनेला १८ महिने झाल्यानंतर त्याच कपाटातील केळी पुरवठ्याच्या फाईली सुद्धा चोरी झाल्याची माहिती आता समोर आल्याने एकच खळबळ माजलेली आहे. लंका रुपी प्रकल्प कार्यालयात कोणता तरी विभीषण असून तोच सुवर्ण लंकेचे दहन करण्याचा कार्यक्रम हाती घेऊन षडयंत्र करत असल्याची जनचर्चा सुरू आहे.

३ जून २०२४ रोजी धारणी शहरातील आदिवासी कार्यालयातील नेमक्या खोलीची खिडकी गॅस कटरने कापून अंडा पुरवठाच्या ९० लाख किंमतीचे दस्तऐवज म्हणजे देयकाची नस्ती चोरण्यात आलेली होती. पोलिस तपास व विभागीय चौकशी सुद्धा सुरू करण्यात आलेली होती. मात्र, कोण जाने काय झाले कि तपास दीड वर्षानंतर ही जैसे थे आहेत. नव्याने प्राप्त माहितीनुसार, अंड्यांच्या दस्तऐवजासोबतच केळी पुरवठाच्या फाईली पण चोरी गेल्याने प्रकल्प विभागाचा पांढरा हत्ती आता पुढे काय करणार? याविषयी आश्चर्याची बाब म्हणजे अंडा पुरवठा दाराचे ९० लाख रुपयांचे देयक मंजुर होऊन वितरण पण झाले. मात्र, केळी पुरवठादाराला आजपर्यंत देयके अदा करण्यात आलेली नाही, हे विशेष. एका माहितीप्रमाणे, दोन वर्षापूर्वी आदिवासी आश्रमशाळांना अंडे पुरवठा करण्याचा कंत्राट चाळीसगाव येथील एका संस्थेला देण्यात आलेला होता. संस्थेने आश्रमशाळांना कमी पुरवठा केला. मात्र, तिप्पट रकमेची देयके लावून पैसे पण काढून घेतले. या षडयंत्राचे बिंग फुटताच नियोजितपणे चोरी घडविण्यात आली. या व्यवहारात एक रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता आहे. कार्यालयातील अनेक कर्मचारी यात संलग्न आहेत. म्हणूनच तपास पुढे सरकलेला नाही. आता चोरी प्रकरणात नवीन ट्वीस्ट आलेले आहे. केळीची फाईल पण चोरी गेल्याची माहिती आहे. काहींच्या भूमिका पण संदेहास्पद वाटत आहे. सीसीटीव्ही कॅमेर्यात आरोपी दिसल्यावरही ओळख न पटणे हे पचणारे कृत्य वाटत आहे.




आदिवासी विद्यार्थ्यांच्या तोंडाचा घास चोरणारी कंपू प्रकल्प कार्यालयात कार्यरत असून वरिष्ठ अधिकार्यांना ब्लॅकमेल केले जाते, अशी गंभीर माहिती आहे. महाराष्ट्र शासन आदिवासी प्रकल्पासाठी अंदाजपत्रकात ९ टक्क्यांपेक्षा जास्त रुपयांची तरतूद करत असते. फाईल चोरी गंभीरपणे घेण्यात आलेले नाही, हे विशेष!


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत